REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील डॉ. ॲनी बेझंट यांचे कार्य



**प्रा. श्रीमती सुरेखा रामदास लगड**
सहायक प्राध्यापक,इतिहास विभाग,
रा.ब. नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर.

## ➢ गोषवारा

स्त्रीला शिक्षणाची संधी मिळाल्यापासून स्त्रियांच्या कर्तबगारीला वाव मिळाला. स्वतंत्र विचाराने कार्य करण्यास स्त्रियांचे प्रयत्न सुरु झाले. त्यातूनच स्त्री जीवनातील परिवर्तनवादी वाटचाल सुरु झाली. रमाबाई रानडे यांनी आर्य महिला समाजाची स्थापना करुन या संस्थेच्या माध्यमातून कुटुंबाबाहेर स्त्रीची अन्य समुदयाशी बांधिलकी असू शकते हा विचार मांडला. समाज सुधारकांनी स्त्रीयांचे जीवन हे अनिष्ट रुढी परंपरेने बांधले गेले होते व स्त्रीयांचे शोषण होत होते. याबदद्ल समाजास जागे केले. स्त्रीयांना मानवी जीवन जगण्यास स्वातंत्र्य असावे त्यांच्या बौध्दीक कुवतीचा समाजाच्या विकासासाठी उपयोग करुन घ्यावा हा विचार पुढे आला. स्त्रीयांच्या विकासासाठी सुरु झालेली ही चळवळ पुरुष वर्गाशी संघर्ष करण्यासाठी मुळीच नव्हती, तर ती मदतीच्या आधारे स्वावलंबनाचे धडे शिकविण्यासाठी होती. ज्या प्रमाणे भारतीय स्त्रीयांचा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग होता त्याच प्रमाणे विदेशी महिलांचे योगदान मोठया प्रमाणात आहे. महात्मा गांधीच्या विचार व कार्याकडे या महिला आकर्षित झाल्या, प्रभावित झाल्या. भारतीय स्वातंत्र्यासाठी त्या वेळप्रसंगी तुरुंगातही गेल्या या महिलांनी विविध संघटना स्थापन करुन त्यात योगदान देवून महिला जागृतीचे कार्य केले. त्यांनी आपल्या लिखानातून, भाषानातून भारताला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे अशी आग्रही भूमीका घेतली. भारतीय स्त्री-पुरुषात राष्ट्रवादी विचारांची जागृती करण्याचे कार्य मादाम कामा, भगिनी निवेदिता, नीलसेना गुप्ता तसेच डॉ. ॲनीबेझंट यांनी केले. डॉ. ॲनी बेझंट यांच्यामुळे राष्ट्रीय नेतृत्वामध्येही स्त्रीया केंद्रस्थानी असू शकतात याची प्रचिती आली. ही इंग्लडमध्ये जन्मलेली भारतीय स्वातंत्र्य सैनिक, समाजसुधारक आणि तत्वज्ञानी होती.

## ➢ प्रस्तावना :

कोणत्याही देशाची चळवळ ही स्त्री शक्तीवर अवलंबून असते. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत स्त्री फार मोठी व अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. स्त्रीला शिक्षण देण्याबरोबरच तिला आर्थिकदृष्या स्वयंपूर्ण बनविण्यासाठी ही प्रयत्न करण्यात आले आहे. स्त्रीला शिक्षणाची संधी मिळाल्यापासून स्त्रियांच्या कर्तबगारीला वाव मिळाला. स्वतंत्र विचाराने कार्य करण्यास स्त्रियांचे प्रयत्न सुरु झाले. त्यातूनच स्त्री जीवनातील परिवर्तनवादी वाटचाल सुरु झाली. रमाबाई रानडे यांनी आर्य महिला समाजाची स्थापना करुन या संस्थेच्या माध्यमातून कुटुंबाबाहेर स्त्रीची अन्य समुदयाशी बांधिलकी असू शकते हा विचार मांडला. समाज सुधारकांनी स्त्रीयांचे जीवन हे अनिष्ट रुढी परंपरेने बांधले गेले होते व स्त्रीयांचे शोषण होत होते. याबदद्ल समाजास जागे केले. स्त्रीयांना मानवी जीवन जगण्यास स्वातंत्र्य असावे त्यांच्या बौध्दीक कुवतीचा समाजाच्या विकासासाठी उपयोग करुन घ्यावा हा विचार पुढे आला. स्त्रीयांच्या विकासासाठी सुरु झालेली ही चळवळ पुरुष वर्गाशी संघर्ष करण्यासाठी मुळीच नव्हती, तर ती मदतीच्या आधारे स्वावलंबनाचे धडे शिकविण्यासाठी होती. डॉ. आनंदीबाई जोशी या भारतातील पहिल्या महिला डॉक्टर होय हे त्यांचे मूर्तीमंत उदाहरण होय.

थोडक्यात स्त्री जीवनातील परिवर्तनवादी चळवळ सुरु झाली. त्याची परिनिती म्हणजे भारताच्या स्वातंत्र्य युध्दात स्त्रीयांनी मोठे योगदान दिलेले दिसते. मग त्या भारतीय महिला असोत किंवा विदेशी महिला झाशीची राणी लक्ष्मीबाई, बेगम हजरत महाल यांनी ब्रिटिशांशी प्रखर लढा दिला. तसेच विणादास यांनी कलकत्याच्या पदवीदान समारंभात बंगालचा गव्हर्नर जॅक्सन यावर गोळी घातली.

ज्या प्रमाणे भारतीय स्त्रीयांचा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग होता त्याच प्रमाणे विदेशी महिलांचे योगदान मोठया प्रमाणात आहे. महात्मा गांधीच्या विचार व कार्याकडे या महिला आकर्षित झाल्या, प्रभावित झाल्या. भारतीय स्वातंत्र्यासाठी त्या वेळप्रसंगी तुरुंगातही गेल्या या महिलांनी विविध संघटना स्थापन करुन त्यात योगदान देवून महिला जागृतीचे कार्य केले. त्यांनी आपल्या लिखानातून, भाषानातून भारताला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे अशी आग्रही भूमीका घेतली. भारतीय स्त्री-पुरुषात राष्ट्रवादी विचारांची जागृती करण्याचे कार्य मादाम कामा, भगिनी निवेदिता, नीलसेना गुप्ता तसेच डॉ. अॅनीबेझंट यांनी केले. डॉ. अॅनी बेझंट यांच्यामुळे राष्ट्रीय नेतृत्वामध्येही स्त्रीया केंद्रस्थानी असू शकतात याची प्रचिती आली. ही इंग्लडमध्ये जन्मलेली भारतीय स्वातंत्र्य सैनिक, समाजसुधारक आणि तत्वज्ञानी होती.

## ➢ अभ्यासाचे महत्व :-

प्रस्तुत अभ्यासात डॉ. अॅनी बेझंट या भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्वपुर्ण योगदान देणाऱ्या आयरिश स्त्रीचे महत्व विशद करण्यात आलेले आहे. प्रस्तुत संशोधन अभ्यासात डॉ. अॅनी बेझंट यांचे जीवन, कौटुंबिक पार्श्वभूमी, राजकीय कार्य, सामाजिक कार्य तसेच त्यांच्या महत्वपूर्ण होमरुल चळवळी विषयी सांगोपांग चर्चा करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनामुळे डॉ. अॅनी बेझंट यांचे जीवनचरित्र राजकीय, सामाजिक कार्य होमरुल चळवळीतील कार्य यांची माहिती मिळणार असल्याने त्याचा फायदा संशोधक, विद्यार्थी, शिक्षक, समाज यांना होईल यात शंका नाही.

## • संशोधनाची उदिष्टे :-

१. डॉ. अॅनी बेझंट यांचे जीवन चरित्र समजावून घेणे.
२. डॉ. अॅनी बेझंट यांचे सामाजिक, राजकिय कार्य समजावून घेणे.
३. डॉ. अॅनी बेझंट यांच्या होमरुल चळवळीचे कार्य समजावून घेणे.
४. डॉ. बेझंट यांचे परदेशातील कार्य समजावून घेणे.
५. होमरुल लीगचा ब्रिटिश भारतावर झालेला परिणाम पहाणे.

## ➢ संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास करताना संशोधकाने दुय्यम साधनसामुग्रीच्या सहाय्याने तथ्य संकलन केले आहे. यात विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, विविध वेबसाईट, मासिके यांच्या साहयाने माहितीचे संकलन केले आहे.

## • डॉ. अॅनी बेझंट यांचे जीवन चरित्र :-

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत डॉ. अॅनी बेझंट या आयारिश स्त्रीचे स्थान महत्वाचे आहे. त्यांचा जन्म १ ऑक्टोबर १८४७ साली झाला. त्यांचे शिक्षण इंग्लड व जर्मनीत झाले. १८६७ मध्ये त्यांचा विवाह रेव्हरंड फ्रॅंक बेझंट यांच्या बरोबर झाला. परंतु पती-पत्नीतील तणावामुळे इ.स. १८७७ ला त्यांचा घटस्फोट झाला. सुरुवातीच्या काळात डॉ. अॅनी बेझंट यांनी इंग्लडमधील आगपेटयाच्या कारखान्यात काम करणाऱ्या स्त्रीयांच्या हक्कासाठी लढा दिला. १८९३ मध्ये शिकागो येथील धर्म परिषदेत त्यांनी भाग घेतला व त्या हिंदुधर्म व संस्कृतीकडे आकर्षित झाल्या. त्यांचे जीवन भारतीय अध्यात्मामुळे फुलले. मॅडम ब्लॅव्हेटस्की व कर्नल ऑलकॉट यांनी स्थापन केलेल्या थिऑसॉफिकल सोसायटी च्या त्या सदस्य बनल्या. पुढे त्या सोसायटीचे त्यांनी अध्यक्षपद ही भूषविले. मॅडम ब्लॅव्हेटस्की यांचा 'सीक्रेट डॉक्ट्रिन' हा ग्रंथ वाचला व जगाचा सांभाळ करणारी एक अदृश्य शक्ती आहे व ती सदैव सावध आहे. यावर त्यांचा विश्वास बसला. व त्या विचारप्रणालीसाठी १८९३ मध्ये त्या भारतात आल्या व भारतालाच त्यांनी आपली कर्मभूमी मानले. जन्माने ख्रिश्चन व मनाने हिंदु असे त्या स्वत:बदद्ल नेहमी म्हणत.

## • डॉ. अॅनी बेझंट यांचे सामाजिक व राजकिय कार्य :-

डॉ. अॅनी बेझंट यांनी इ.स. १८९८ मध्ये प्राचीन ग्रंथाचा अभ्यास करण्यास बनारस येथे "Central Hindu College" ची स्थापना केली. पुढे याच कॉलेजचे रुपांतर बनारस हिंदु विद्यापीठात झाले. भारताचा सांस्कृती वारसा उज्जवल आहे असे त्या म्हणत. भारताच्या स्वातंत्र्याचा त्यांनी सदैव पुरस्कार केला. त्या समाजवादी विचारसरणीच्या होत्या. १८७५ मध्ये चार्ल्स ब्रॅडलाफ या विचारवंताबरोबर 'द फ्रुटस ऑफ फिलॉसॉफी' हा प्रबंध लिहिला. त्यांच्या या

लिखानाबददल त्यांना ६ वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा झाली. डॉ. बेझंट यांनी थिऑसॉफीकल सोसायटीच्या प्रचारासाठी भारत व जगात दौरे करुन जगात शांतता व बंधुभाव नांदावा म्हणून उपदेश केला. पाश्चात्य शिक्षणाला प्राचीन भारतीय विद्येची जोड देवूनच भारतीय समाजाचे उन्नयन करता येईल असे त्यांचे मत होते. परंतु बरीच वर्ष कार्य केल्यानंतर केवळ धार्मिक व शैक्षणिक सुधारणांनी प्रगती होणार नाही. त्यासाठी स्वशासनाचे अधिकार भारतीयांना मिळाले पाहिजे हे लक्षात आल्यावर त्यांनी जनजागृती केली. १९१४ साली त्यांनी 'कॉमनवील' नावाचे साप्ताहिक सुरु केले. या साप्ताहिकाचा मुख्य हेतु ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वशासित वसाहतीचा दर्जा मिळवून देण्याचा होता. तसेच त्यांनी न्यू इंडिया नावाने दैनिक सुरु केले. इंग्लड महायुध्दात गुंतलेले असताना राजकिय मागणी जोराने रेटल्यास इंग्लड त्याकडे दुर्लक्ष करु शकत नाही असे त्यांना वाटत. इंग्लडची अडचण ही भारताची सुर्वणसंधी आहे. स्वशासनाचे अधिकार मिळवून घेण्याची हीच ती वेळ आहे असे त्यांचे मत होते. भारतीयांची स्वशासनाची मागणी रास्त आहे. इंग्लडने दयावयाची ती भीक नसून तो भारतीयांचा अधिकार आहे. इंग्लडने आपले शासन भारतावार वर्षानुवर्ष लादणे मुळीच समर्थनीय नाही असे निर्भिडपणे त्या मांडत होत्या.

विशेष म्हणजे एका ब्रिटिश महिलेने इतक्या तळमळीने आणि निर्भिडपणे भारताच्या कल्याणासाठी झटणे हा अनुभव भारतीयांसाठी अभुतपुर्व होता. त्यांनी मद्रासला Womens Indian Association ची स्थापना केली.

- **डॉ. ॲनी बेझंट यांच्या होमरुल चळवळीचे कार्य :-**

डॉ. ॲनी बेझंट यांनी सप्टेंबर १९१६ मध्ये होमरुल लीगची स्थापना केली. होमरुल म्हणजे स्वशासन आपल्या देशाचा राज्य कारभार करण्याचा आधिकार आपण प्राप्त करुन घेणे म्हणजे होमरुल होय. ही चळवळ मुळात आर्यलंड या देशातील लोकांनी ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी जोखडातून मुक्त होण्यासाठी सुरु केली होती. बेझंट यांनी या चळवळीचे बारकाईने निरिक्षण करुन भारत व आर्यलंड या दोन्ही देशाची राजकिय समस्या सारखीच असल्याने आर्यलंड प्रमाणे भारतातही होमरुल चळवळ सुरु केल्यास भारतीय लोकांच्यात जागृती निर्माण होईल असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी भारतात होमरुल लीगची स्थापना केली.

होमरुलच्या प्रचारासाठी त्यांनी व्याख्याने दिली वृत्तपत्रे काढली व आपले विचार लोकांपर्यत पोहचविले. होमरुलच्या वाढत्या प्रचाराचा जनतेवरील प्रभाव सरकारच्या डोळयात खुपू लागला. यावेळी महायुध्द काळात प्रत्येक आघाडीवर इंग्लडची पिछेहाट होवू लागली होती. अशा आणिबाणीच्या परिस्थितीत या होमरुल आंदोलनाची सरकारला धास्ती वाटू लागली. याशिवाय मुस्लिम लीग व कॉंग्रेस या संघटना राजकीय क्षेत्रात परस्पर नजीक आल्या होत्या. अशा बिकट परिस्थितीत सरकारने ॲनी बेझंट व टिळक यांची मुस्कटदाबी करण्याचा निर्णय घेतला. मद्रास सरकारने बेझंट यांच्या वृत्तपत्रासंबधी भारी रक्कमेचे जामीन घेतले होते. बेझंट यांनी न्यायालयात धाव घेतली परंतु त्यांना न्याय मिळाला नाही. तसेच सरकारने लोकमान्य टिळकांविरुध्द खटला भरला व जामीन देण्यासंबधी हुकूम बजावला. टिळकांनी हा हुकूम कोर्टातून रदद् करुन घेतला.

डॉ. ॲनी बेझंट व टिळक यांच्या होमरुल चळवळीने सरकार अडचणीत येवू लागले. तरी देखील त्यांची दडपशाही थांबली नाही. मुंबई सरकारने ॲनी बेझंट यांना मुंबईत प्रवेशास बंदी केली. त्यांना स्थानबध्द करण्यात आले व त्यांच्या सहकार्याना कैदेत टाकले. बेझंट यांच्या कारवाईच्या निषेधार्थ सर्व देशभर सभा व मोर्चे निघू लागले. १९१७ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती केली.

- **डॉ. ॲनी बेझंट यांचे परदेशातील कार्य :-**

होमरुल चळवळ केवळ भारतापूरती मर्यादित न राहता तीने परदेशात आपल्या कार्याचा ठसा उमटविला. इंग्लड व अमेरिका या देशात होमरुलच्या प्रचार कार्यास सुरुवात झाली. तेथील वृत्तपत्रांनी त्यांची दखल घेतली. अमेरिकेत इंग्लडच्या साम्राज्यवादी धोरणावर सडकून टीका होऊ लागली. अमेरिकेतील लोकमत हिंदी स्वातंत्र्य चळवळीस अनुकूल व्हावे म्हणून सॅनफ्रॅन्सिस्को या ठिकाणी होमरुलची शाखा स्थापन करण्यात आली व त्याच्या वतीने इंग इंडिया नावाचे वृत्तपत्र सुरु केले कि ज्या वृत्तपत्राने हिंदुस्थानच्या प्रश्नांची सत्य स्थिती अमेरिकन लोकांसमोर मांडण्याची कामगिरी केली. इंग्लडमध्ये ही होमरुलच्या अनेक शाखा स्थापन झाल्या. ॲनी बेझंट यांनी ब्रिटिश मजूर नेत्यांना हाक दिली. त्यांच्या प्रयत्नाने इंग्लडमधील अनेक नेते हिंदी स्वराज्यास अनुकूल बनू लागले. आर्कषक व्यक्तिमत्त्व, रसाळवाणी, भारताबददलची तळमळ व आत्मीयता इत्यादी गुणांमुळे त्यांच्या भारतीयांवर प्रभाव पडला.

- **टिळक व होमरुल चळवळ :-**

१९०८ मध्ये टिळकांच्या अटकेने कॉंग्रेसची चळवळ थंडावली, परंतु ज्यावेळी टिळकांची सुटका झाली तो काळ महायुध्दाचा होता. या काळात जर सरकारकडें काही राजकिय मागण्या मागितल्यास सरकार त्या नाकारु शकत नाही. परंतु त्यासाठी जनतेत जागृती करणे गरजेचे होते. याच वेळी जहाल मवाळ ऐक्य निर्माण झाले. विशेष म्हणजे मुस्लीम लीग देखील कॉंग्रेसमध्ये सामील झाली. टिळकांनी राजकिय जागृतीसाठी प्रयत्न सुरु केले. या प्रयत्नाला एक भाग म्हणजे होमरुल चळवळ होय. बेळगांव अधिवेशनात टिळकांनी होमरुल लीगची स्थापना केली. दोन्ही होमरुल लीगमध्ये संघर्ष नको म्हणून त्यांनी आपले कार्यक्षेत्र ठरवून घेतले. टिळकांची होमरुल मुंबई वगळता महाराष्ट्र, कर्नाटक, वऱ्हाड, मध्यप्रांत इ. तर उर्वरीत प्रदेशात ॲनी बेझंट यांची होमरुल लीग कार्यरत होती. होमरुलच्या प्रचारासाठी टिळकांनी महाराष्ट्रात दौरा केला तसेच भाषणातून जनजागृती केली. ही चळवळ सरकारची डोके दुखी बनली. म्हणून भारतमंत्री मॉंटेग्यु यांनी २० ऑगस्ट १९१७ रोजी मॉंटेग्यु घोषणा केली. व हे आंदोलन थंडावले. ॲनी बेझंट यांनी होमरुल चळवळीतून माघार घेतली. थोडक्यात ऑगस्ट घोषणेने भारतीयांचे लक्ष वेधून घेतले.

- **होमरुल चळवळीचे फलित :-**

होमरुल आंदोलनापासून स्वातंत्र्य चळवळ जनआंदोलनाच्या दिशेने वाटचाल करु लागली. लोकांमध्ये राजकिय जागृती निर्माण झाली. पुढील स्वातंत्र्य चळवळीचा पाया भक्कम झाला. हिंदी जनतेतील राजकिय जागृतीची दखल सरकारने घेतली. सरकारला आपल्या धोरणात बदल करावा लागला. याचेच उदाहरण म्हणजे १९१७ ची मॉंटेग्यु घोषणा होय.

मॉटेग्यु घोषणेमुळे होमरुल चळवळीची गती मंदावली असली तरी भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील होमरुल चळवळीचे महत्व नाकारता येत नाही.

- **संदर्भ :-**


१) गाठाळ, साहेबराव. (१९९८), *"आधुनिक भारताचा इतिहास"* (१८८५ ते १९४७), औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स.
२) आठल्ये, विभा. (२००४), *"आधुनिक भारताचा इतिहास"*, (१७६० ते १९५०), नागपूर? अंशुल पब्लिकेशन्स.
३) वक्काणी, नि. आ. (१९९८) *"आधुनिक भारताचा इतिहास ब्रिटिश कालीन भारत"* (१७५७ ते १९६५), नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.
४) शहा, जी. बी. आणि भामरे, आर. पी. आणि पवार, एम. डी. (२०१४) *"आधुनिक भारताचा इतिहास"* (१७५७ ते १९५०) जळगाव, प्रशांत प्रकाशन.
५) गाठाळ, एस. एस. (२०१५), *"भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास"*, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स.
६) वैद्य, सुमन आणि कोठेकर, शांता (१९९६) *"आधुनिक भारताचा इतिहास"* (१८५८ ते १९२०) नागपूर, श्री. साईनाथ प्रकाशन.
७) पवार, जयसिंगराव आणि पवार, वसुधा, *"आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास"*. (१७५७ ते १९५०) नागपूर, विद्या प्रकाशन.
८) www.googal.co.in.
९) www.yahoo.com.